**नि.फौ.ख.क्र.१४३/२०२१**
सरकार – वि.- तरुणकुमार मोहन व इतर
**निशाणी क्र. ३९**

**<u>सरकारपक्षा तर्फे साक्षीदार क्र. १ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव – सुनिल नायकु भोकरे (फिर्यादी)**
वय – ५८ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त, एएसआय, लोहमार्ग पो.स्टे., पुणे
सध्या रा. - केशवनगर, मुंढवा, पुणे.

**<u>सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.एस.काळे यांचेमार्फत शपथेवर सुरु-</u>**

दि. २५/०५/२०२१ रोजी माझी नेमणुक स्थानीक गुन्हे अन्वेषण शाखा, लोहमार्ग पोलीस स्टेशन, पुणे येथे सहा. पोलीस उप.निरीक्षक या पदावर होती. त्यादिवशी पोलीस निरीक्षक सय्यद यांनी मला त्यांचे कार्यालयात बोलवुन सांगितले की, पोलीस अधिक्षक साहेबांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली आहे की, रेल्वेमध्ये प्राण्यांची व अंमली प्रदार्थांची तस्करी होत आहे. त्यामुळे स्टाफसह पुणे ते लोणावळा या भागात गस्त घाला. त्यानंतर आम्ही चेन्नई ते एल.टी.टी. या गाडीमध्ये आम्ही पेट्रोलींग चालु केले. आम्ही पुणे रेल्वे स्टेशनवरुन त्या गाडीत चढलो. आम्ही एकुण पाच कर्मचारी होतो. काही कर्मचारी मागुन व काही समोरुन ट्रेनमध्ये चढलो. आम्ही सर्व गाडी तपासत होतो. देहुरोड ते तळेगांव रेल्वे स्टेशनच्या दरम्यान ए.सी. ए-१ या डब्यातील सीट क्र. ९ व ११ या जागेवर बसलेल्या प्रवाशांचा आम्हाला संशय आला तसेच त्यांच्या सीट खाली एकुण चार बॅगा व दोन सॅकबॅग असल्याने आम्ही त्यांची चौकशी केली. त्यातील एकाने त्याचे नाव तरुणकुमार मोहन व दुस-याने श्रीनिवास कमल असे नाव सांगितले. आम्ही त्यांना कुठे जात अहात याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, त्यांचा माशांचा व्यवसाय आहे व मासे पाठवण्याचे काम करतात. बॅगमध्ये काय आहे याबाबत विचारले असता त्यांनी आम्हाला उडवाउडवीची उत्तरे दिली. आम्ही त्यांची सॅकबॅग उघडली असता त्यात आम्हाला फायटर फिश दिसले. खालच्या बॅग उघडल्या असता जाळीच्या पिशवीमध्ये कासव व सरडे दिसले. आम्ही लगेच आमच्या वरिष्ठांना सदरची माहिती दिली. वरिष्ठांनी सांगितले की, लोणावळा येथे उतरुन आऊटपोस्टला दोन्ही व्यक्तींना घेवुन मुददेमालासह थांबा. आम्ही लोणावळा येथे त्यांना त्यांचे बॅगेसह उतरवुन आऊटपोस्टला थांबलो.

२. आमचे वरिष्ठ दुपारी ०३.३० वाजण्याच्या दरम्यान तेथे पोहचले. वरिष्ठांनी वन विभागाला घटनेची माहिती दिली असल्याने ते पण लोणावळा येथील आऊटपोस्टला आले होते. वन विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांनी आम्हाला सांगितले की, पकडलेल्या प्राण्यांच्या सर्व जाती परदेशी आहेत, ते त्यांना येथे समजणार नाही. चांदणी चौकात असलेले रेस्क्यु चॅरिटेबल ट्रस्ट येथे घेवुन जावु. त्यानंतर प्राण्यांबाबत सर्व माहिती कळेल. ट्रस्टच्या अध्यक्ष मॅडम नेहा पंचमीया यांनी प्राण्यांची सर्व पाहणी केली. त्यांनी सांगितले की, सदरची जात ही **'अफ्रीकन सलकटा'** व **'टॉरटॉईज'** असे आहेत. मासेबाबत त्यांनी सांगितले की, मासे हे **'बेटा फिश'** प्रजातीचे आहेत. एकुण प्राणी १७१६ होते त्यातील १६७९ हे जिवंत राहिले होते व इतर प्राणी हे प्रवासा दरम्यान गुदमरुन मेले आहेत असे त्यांनी सांगितले होते. त्यानंतर आम्ही सर्व प्राणी त्यांच्याकडे जमा केले व पोलीस स्टेशनला परत आलो. पोलीस स्टेशनला परत आल्यानंतर मी आरोपींविरुध्द फिर्याद दिली. ती फिर्याद दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला सदरची फिर्याद दाखवण्यात आली. ती तीच असुन त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. ४०** देण्यात येतो. फिर्यादीनुसार दाखल प्रथम खबरी अहवाल पाहिल्यास मी ओळखु शकतो. आता मला प्रथम खबरी अहवाल दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. ४१** देण्यात येतो. आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकतो. ते आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपींतर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ श्री. आर. टी. देशमुख यांच्यामार्फत सुरू-</u>**

३. घटनेच्या वेळी मी कोर्ट पैरवी म्हणुन कार्यरत होतो. कोर्ट पैरवी म्हणुन मी सर्व लोहमार्ग पोलीस स्टेशनची माहिती संकलीत करुन ठेवत असे. हे म्हणणे खरे नाही की, कोर्ट पैरवी हा न्यायालयातील समन्स व वॉरंट बजावणीसाठी पोलीस स्टेशनमध्ये संबंधीत कर्मचा-यांना देवुन बजावण्यात आलेले अहवाल परत न्यायालयात दाखल करतो. पोलीस अधिक्षक साहेब घटनेच्या वेळी संगम ब्रिज येथील कार्यालयात बसत असत. सय्यद साहेब देखील त्याच कार्यालयात बसत असत. आमचे कार्यालय देखील तेथेच होते. आम्ही आमची तपासणी पुणे रेल्वे स्टेशन येथुन सुरू केली होती. आमचे कार्यालय ते पुणे रेल्वे स्टेशन दोन ते अडीच किलो मीटरवर आहे. सय्यद साहेबांनी आम्हाला घटनेच्या आदल्या दिवशी संध्याकाळी ०५.३० वाजण्याच्या दरम्यान त्यांचे कार्यालयात बोलवले होते.

४. लोहमार्ग पोलीस स्टेशन हे स्वतंत्र असुन आम्ही स्वतंत्र स्टेशन डायरी संभाळतो. त्यावेळी स्टेशन डायरी सीसीटीएनएस प्रणालीमध्ये तसेच प्रत्यक्षरित्या देखील बनवली जात असत. आम्हाला देण्यात आलेले आदेश लेखी स्वरुपातील होते. तो आदेश मी आज रोजी माझेसोबत आणलेला आहे. त्याचेसोबत डायरेक्टर जनरल साहेबांचा आदेश देखील आहे. सदरच्या दस्तावर पोलीस निरीक्षकांची सही आहे. सदरील दस्तास **नि.क्र. ४२** देण्यात येतो. २५ तारखेला पेट्रोलींग करणेबाबतचे लेखी आदेश आम्हाला देण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे कार्यरत असल्याने मला वेगळे रेल्वे तिकीट काढण्याची आवश्यकता नव्हती. आमच्या टीममध्ये मी वरिष्ठ होतो. मला नक्की सांगता येणार नाही की, दि. २४ व २५ बाबतची मी स्टेशन डायरी नोंद केली होती किंवा कसे. विशेष गोष्ट असेल तेव्हा आम्ही स्टेशन डायरी नोंद घेतो.

५. तपासणी करीता आम्ही वेगवेगळ्या डब्यांमध्ये वेगवेगळे कर्मचारी पाठवले. ए-१ या डब्यामध्ये मी, शेख व पवार असे तिघे होतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रवाशांचे नाव व त्यांचा सीट क्रमांकाची यादी ही एस.सी. डब्याच्या बोगीच्या बाहेर चिकटवलेली असते. हे म्हणणे खरे आहे की, संशयीत वस्तुची तपासणी करायची असल्यास बुथवर सीसीटीव्हीच्या निगराणी खाली करावी असे आदेश आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पहिल्यांदा बॅगची तपासणी केली तेव्हा तेथे सीसीटीव्ही उपलब्ध नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींच्याकडे असलेल्या सर्व बॅग आमच्या कर्मचा-यांनी लोणावळा स्टेशन येथे खाली उतरवल्या नाहीत. मी आरोपींची अंगझडती लोणावळा येथील चौकीत घेतली. त्यांच्याकडे पाकीट, पेन व पैसे असे काही आढळुन आले नाही. मी त्यांना रेल्वेच्या तिकीटाबाबत विचारणा केली होती. हे म्हणणे खरे आहे की, विना तिकीट प्रवास करणे गुन्हा आहे. अशा गुन्हयाबाबत आरोपींना न्यायालयात हजर करावे लागते याची मला माहिती आहे. मी आरोपींचा अंगझडती पंचनामा केला नव्हता. आरोपींकडुन मिळालेली प्रवासाची तिकीटे मी अंतरकर साहेबांना दिली होती.

६. लोणावळा रेल्वे स्टेशन येथे लोहमार्ग पोलीस स्टेशनचे दुरक्षेत्र आहे. मी स्वतः लोणावळा येथे आरोपींच्या बॅगांची झडती सीसीटीव्ही निगराणी खाली घेतली नाही. मी झडती रजिस्टरमध्ये नोंद केली नव्हती. माझे समक्ष किंवा मी स्वतः कोणताही पंचनामा केला नाही. तपास अधिकारी किंवा ठाणे अंमलदार यांनी फिर्याद दोन दिवस उशिरा का दिली याबाबत मला कुठलेही कारण विचारले नाही. मी त्यांना स्वतःहुन काही सांगितले नाही.

प्रश्न- नि. क्र. ४१ वरील प्रथम खबरी अहवालामध्ये **'गुन्हा उशिरा दाखल करण्याचे कारण सांगितलेवरुन आज**

**रोजी गुन्हा दाखल करत आहे'** असे लिहण्याचे काय कारण ?

उत्तर - त्याचे कारण मला सांगता येणार नाही.

प्रश्न- नि.क्र. ४० वरील फिर्यादीमध्ये '**चार ट्रव्हल बॅंगा व दोन सॅक बॅगा तपासकामी ताब्यात घेवुन पंचनामा पुर्ण केला आहे'** असे लिहण्याचे काय कारण आहे ?

उत्तर- त्याचे कारण मला सांगता येणार नाही.

७. चार ट्रव्हल बॅगा व दोन सॅक बॅगचे वर्णन मी फिर्याद देताना सांगितलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस अधिक्षक साहेबांना गुप्त बातमीदारामार्फत प्राण्यांची व अंमली पदार्थाची तस्करी होत असल्याची बातमी मिळाल्याचे व त्यानुसार आम्हाला बोलवुन घेतल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ए-१ बोगीमध्ये सीट क्र. ९ व ११ या जागेवर सीट खाली एकुण चार बॅगा व दोन सॅकबॅग मिळाल्या असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, चौकशीमध्ये आरोपींनी त्यांचे नावे तरुणकुमार मोहन व दुस-याने श्रीनिवास कमल असे सांगितल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या बॅगेतुन **'अफ्रीकन सलकटा'** व **'टॉरटॉईज'** असे प्रकारचे प्राणी व **'बेटा फिश'** मिळुन आल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद देवुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.01.19 17:27:10 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. १९/०१/२०२६